## सी. ई. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
## कुंकळ्ळी – गोवा.

### मराठी विभाग

# युवांकुर

मराठी विभागाचे साहित्यिक मासिक,
आपल्या हक्काचे व्यासपीठ
अंक २, ऑक्टोबर २०२२



**असेन मी, नसेन मी**
**तरी असेल गीत हे**
**फुलाफुलांत येथल्या**
**उद्या हसेल गीत हे..**
**-शांता शेळके**

# कवयित्री शांता शेळके



## अर्पण

शब्दांवर प्रेम करणाऱ्या व करायला शिकवणाऱ्या अक्षर माऊलींना..

**अनुमोदक :** प्राचार्य डॉ. संजय सावंत देसाई

**संपादिका :** सहायक प्रा. शुभलक्ष्मी नाईक गांवकर

**सह-संपादिका :** सहायक प्रा. निखिता गांवकर

**विद्यार्थीनी प्रतिनिधी:** श्रद्धा महाले

**मुखपृष्ठ:**

धन्यता देसाई

सौरव गोवेकर

**रेखाचित्र:** संजीव कासार

# अनुक्रमणिका

❖ **संपादकीय** / पृ. ४

❖ **परिचय –** कवयित्री शांता शेळके/ सरोजा गांवकर/ पृ. ५

❖ **परीक्षण**

१. ‘गोंदण’- सृष्टीचं शब्दरुपी गोंदण/ अनामिका सावंत/ पृ. ८

२. प्रेमाचा खरा अर्थ सांगणारी कविता- ‘विश्व प्रेमिकांचे’ / सरोजा गांवकर/ पृ. १०

❖ **निबंध वाङ्मय**

१. निसर्ग/ रेखा मायनाथ / पृ. १२

२. मला पंख असते तर ? / करिश्मा जाधव/ पृ. १२

३. माझे स्वप्न / प्रीती जामुनी / पृ. १६

❖ **कविता**

१. मुलगी झाली म्हणून काय झाले?/ धन्यता देसाई /पृ. १८

२. एक तरी मुलगी असायलाच हवी/ श्रद्धा महाले/पृ. १९

३. आमची मुलगी/ पूजा खोलकर/ पृ. २१

४. गुरु आणि शिष्य/ सिद्धू लांबोर/ पृ. २२

५. मन/ अनामिका सावंत/ पृ. २३

६. रात्र/ नवनाथ वेळीप/ पृ. २४

❖ **थोडं व्याकरण शिकुया**

१. विभक्ती / वैभवी फातर्पेकर / पृ. २६

**।। शब्दची आमुच्या जीवाचे जीवन**
**शब्दे वाटू धन जनलोका ।।**

-संत तुकाराम

# संपादकांच्या खिडकीतून डोकावताना..

प्रिय वाचकहो..

मराठी विभागाच्या ‘युवांकुर’ e-मासिकाच्या पहिल्या अंकाला आपण जे भरभरून प्रेम दिले त्याबद्दल आपले मन:पूर्वक आभार. एखादे चांगले काम करत असताना पाठीवर मिळालेली शबासकीची थाप उमेद वाढवते व हुरूप आणते. हीच प्रेरणा घेऊन युवांकुर मासिकाचा दूसरा अंक आपल्यासमोर आम्ही ठेवत आहोत. यंदाचे वर्ष हे अजरामर कवयित्री शांता शेळके यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. शांताबाईंनी शब्दांवर प्रेम केले आणि करायला शिकवले. त्यांचे शब्दरूपी गोंदण सर्वांच्याच मनावर कोरूण्यासाठी ह्या महिन्याचा अंक त्यांना अपर्ण केला जात आहे.

पहिल्या अंकाला जसे आपण प्रेम दिले तसेच ह्याही अंकाला द्याल अशी आशा बाळगतो.

मनस्वी आभार,

संपादिका:
सहायक प्रा. शुभलक्ष्मी नाईक गांवकर
shubhlaxminaikgaonkar@cescollege.ac.in

सह-संपादिका:
सहायक प्रा. निखिता गांवकर
nikhitagaonkar@cescollege.ac.in

# कवयित्री शांता शेळके

-सरोजा गांवकर (द्वितीय वर्ष कला)

शांता शेळके  यांचा जन्म १२ ऑक्टोंबर १९२२ साली पुणे जिल्ह्यातील इंदापूर या गावी झाला. एक प्रसिद्ध कवयित्री म्हणून त्या विख्यात आहेत. त्यांनी अनेक साहित्यप्रकार हाताळले आहेत. जसे की, कथा, कादंबरी, कविता, चरित्रलेखन, वृत्तपत्रात सदरलेखन इत्यादी.

शांता शेळके यांना मिळालेले पुरस्कारः

- गदिमा गीतलेखन पुरस्कार १९९६.
- सुरसिंगार पुरस्कार (‘मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश’ या गीतासाठी ).
- केंद्र सरकारचा उत्कृष्ट चित्रगीत पुरस्कार (चित्रपट भुजंग).
- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कार (२००१) साहित्यातील योगदानबद्दल.

बालसाहित्याच्या जगातही त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. अनेक नाटके, ध्वनी मुद्रिका, चित्रपटांसाठी त्यांनी विपुल गीतलेखन केले. ‘तोच चंद्रमा’, ’कळयांचे दिवस फुलांच्या राती’, ‘चित्रगीते’ ही त्यांची गीतसंकलने प्रसिद्ध आहेत. शांताबाईंनी हिंदी, इंग्रजी, संस्कृत या भाषांमधील साहित्याचे अत्यंत ओघवत्या शैलीत मराठी भाषांतर केलेले आहे. महाकवी कालिदासाचे ‘मेघदूत’, ‘चौघीजणी’ त्यांच्या कवितांबरोबरच त्यांचे गद्यलेखन सुद्धा खूप सुंदर आणि मनाला पकडून ठेवणारे आहे. वाचायला घेतले की सोडवत नाही त्यांची पुस्तके. त्यांचे गुलमोहोर, कावेरी, बासरी, इत्यादी कथासंग्रह तर ओढ, धर्म, अशा कादंब-या प्रसिद्ध आहेत.

धूळपाटी नावाचे त्यांचे आत्मचरित्र सुद्धा खूप सुंदर आहे. स्वतःच्या लहानपणाबद्दलच्या त्यातील आठवणी तर आपल्याला हेवा करायला लावतात. तसेच ‘पावसाआधीचा पाऊस’, ‘आनंदाचे झाड’, ‘वडीलधारी माणसे’ हे त्यांचे ललित लेख संग्रह खूपच गाजलेले आहेत. भाषांतर हे शांताबाईंच्या दृष्टीनी फक्त अर्थार्जनाचे साधन नव्हते तर स्वतःच्या भाषाभ्यासातील भर टाकणारेपण होते. त्यातील अत्यंत गाजलेले भाषांतर म्हणजे जपानी हायकुंचे. जपान मधील हा काव्यप्रकार त्यांनी अनुवादित करून मराठी रसिकांच्या पुढे ‘पाण्यावरच्या पाकळया’ नावानी ठेवला आणि तो लोकांना इतका आपला वाटला की लोक आता मराठी हायकू असंच म्हणतात.

जरी अनेक साहित्य प्रकार समर्थपणे हाताळले असले तरी, कविता लेखन हा शांताबाईंच्या विशेष आवडीचा साहित्य प्रकार. शांता शेळके यांचे काही प्रसिद्ध काव्यसंग्रह पुढील प्रमाणे आहेत, ‘रूपसी’(१९५६), ‘तोच चंद्रमा’(१९७३), ‘गोंदण’(१९७५), ‘अनोळख’(१९८६), ‘कळयांचे दिवस

फुलांच्या राती'(१९८६), 'जन्मजान्हवी'(१९९०), 'चित्रगीते'(१९९५), 'पूर्वसंध्या'(१९९६), 'इत्यर्थ'(१९९८) इत्यादी. '

'मुक्ता आणि इतर गोष्टी' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. 'स्वप्नतरंग' ही त्यांची पहिली कादंबरी; तर 'शब्दांच्या दुनियेत' हा त्यांचा पहिला ललितलेखसंग्रह. त्यांनी उत्तम अनुवादही केले.

"मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश" सारखी भक्ती गीते लिहिली. "शूर आम्ही सरदार" आणि "मराठी पाऊल पडते पुढे" या सारख्या चित्रपट गाण्यांनी अनेकांना स्फुरण दिलंय. वास्तविक शांता शेळके म्हणजे सगळ्या लहान मुलांच्या लाडक्या आजी. नातवंडांसाठी "किलबिल किलबिल पक्षी बोलती", "विहीणबाई विहीणबाई" अश्या अनेक छान छान कविता, बालगीतं लिहिणाऱ्या.

शांता शेळके यांनी अनेक वर्षे नाटक आणि चित्रपटांच्या सेन्सॉर बोर्डावर काम केले. १९९६ मध्ये आळंदी येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलानाच्या त्या अध्यक्षा होत्या. संतांचे अभंग व ओव्या, तसेच पारंपरिक स्त्रीगीते, लोकगीते इत्यादींचे संस्कार त्यांच्या कवितेतून प्रत्ययास येतात. गीतांचे लावण्या, कोळीगीते असे विविध प्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळले आहेत.

**संदर्भ :**

- गणोरकर, प्रभा; डहाके, वसंत, आबाजी आणि अन्य (संपा),*संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश (१९२०-२००३)*, मुंबई, २००४.



# परीक्षण

## ‘गोंदण’ – सृष्टीचं शब्दरुपी गोंदण.

-अनामिका पांडुरंग सावंत (प्रथम वर्ष कला)

शांता शेळके हे नाव संगळयांच्याच परिचयाचे आहे. कथा, कादंबऱ्या, समीक्षात्मक लेखन, आत्मपर लेखन, ललित लेख, व्यक्तिचित्रे, अनुवाद, कविता असे अनेक साहित्यप्रकार त्यांनी हाताळलेले आहेत. परंतु, कविता हा त्यांचा सर्वात आवडता आणि मनाला जवळचा असणारा साहित्यप्रकार होय. त्यांनी अनेक कवितासंग्रह लिहिलेले आहेत. ‘गोंदण’ हा त्यांचा तिसरा कवितासंग्रह आहे.

‘गोंदण’ या कवितासंग्रहात त्यांनी विविध विषय हाताळलेले आहेत. निसर्गाच्या माध्यमातून त्या स्वतःला शोधू पाहतात. त्यांच्या विरह, दुःखविषयक कवितांमध्ये निसर्ग नकारात्मक स्वरूपात आपल्याला दिसतो. तर, सकारात्मक आशय असलेल्या कवितांमध्ये निसर्गाचे सौंदर्य वेगवेगळया शब्दात त्यांनी वर्णन केलेले आहे. तसेच, अनेक सुनीते व शार्दूलविक्रीडीतासारख्या वृत्तांत त्यांनी कविता लिहिलेली आहे. तसेच, या कवितासंग्रहात तब्बल १०३ कवितांचा समावेश केलेला आहे.

या काव्यसंग्रहात कवयित्रीने दुःख या विषयावर अनेक कविता लिहिलेल्या आहेत. या संदर्भात ‘स्मरणाच्या पार’, ‘लिंबाच्या पालवीत’, ‘खूप प्रयासाने आवरावा हुंदका’ अशा अनेक कविता लक्षणीय ठरतात. ‘लिंबाच्या पालवीत’ या कवितेत कवयित्री आयुष्यात आलेल्या अपार दुःखाचे वर्णन करतात. ‘ढग येतात’ ही अजून एक वैशिष्ट्यपूर्ण कविता आहे. आपण आपल्या भावना मनाच्या तळाशी कुठेतरी पुरून ठेवतो. जसे ‘वांझोटे ढग’ पावसाची बरसात करू शकत नाहीत व त्यामुळे नवे अंकुर मातीतून फुटू शकत नाहीत. तसेच, आपल्याला जवळची वाटणारी व्यक्ती सोबत नसेल तर आपल्या मनात पुरून ठेवलेल्या शब्दांना अंकुर फुटत नाहीत व त्या शब्दांचा केवळ भुसा होऊन जातो. या कवितेत ‘वांझोटे ढग’ म्हणजे आपल्याला जवळची न वाटणारी माणसे अशी प्रतिमा त्या वापरतात.

‘पैठणी’ या कवितेत आजी व नात यांचे गोड नाते उलगडत असतानाच संपूर्ण स्त्रीजन्मावर त्या भाष्य करतात. एका स्त्रीचा लग्नापासून ते मृत्यूपर्यंतचा प्रवास एका पैठणीमधून त्या सांगतात. ही पैठणी काही साधीसुधी पैठणी नाही. या पैठणीला आणि तिच्या आज्जीला सर्वांचे आशीर्वाद मिळालेले आहेत म्हणूनच ती पैठणी खास आहे असे त्यांना वाटते. पैठणीचा पोत कालांतराने जसा मऊ होतो तसेच कुठलीही बाई कालांतराने संसारात पूर्णपणे रुळून जाते. हाच आशय त्या पुढील शब्दात व्यक्त करतात. ‘वर्षामागुनी वर्षे गेली, संसाराचा सराव झाला/ नवा कोरा कडक पोत, एक मऊपणा ल्याला.’

'आजोबा' या कवितेत कवयित्री आपल्या आजोबांविषयी सांगताना त्यांच्या संपूर्ण आयुष्याचा खडतर प्रवास मांडत आहेत. मात्र त्यांची कसलीच तक्रार नाही. त्यांच्या मुखात केवळ सगळ्यांसाठी आशीर्वादच आहेत.

आपले बालपण हा कवयित्रींच्या मनातला एक अत्यंत हळुवार कोपरा आहे. बाळपणीतले खेळ, शाळेतील आठवणी इत्यादींचे वर्णनही त्या करतात. आपले हेच बालपण सुटून गेले याचे दुःख अनेक कवितेतून त्या व्यक्त करतात. जसे कि, 'देवपाट', 'खिडकीपाशी एक मुलगी', 'सखी' इ.

'वण' या कवितेत जुन्या कटू आठवणी शरीरावर असलेल्या पुसटशा वणामुळे आठवू लागतात. तर, 'एकाकी' या कवितेत आपण सगळे शेवटी एकटेच आहोत हा आशय व्यक्त होतो. दुःखी आठवणींबरोबरच सकारात्मक विचारही त्या आपल्या कवितेतून मांडू पाहतात. या दृष्टीने 'एखादा शब्द, एखादा सूर', 'धून' , 'दान', 'तुझे पाप आणि पुण्य' या कविता पाहता येतात. तसेच, जुन्या आठवणीही त्यांना त्रास देत आहेत. त्या दृष्टीने 'निळे नितळ आभाळ', 'काही', 'दिशादिशांतून आले' इ. कविता महत्वाच्या आहेत.

या कवितासंग्रहात 'मालन' ही एक दीर्घ कविताही त्यांनी लिहिलेली आहे. एका नव्या नवरीचा नवरा वारल्यावर त्या स्त्रीवर आलेला दुःखाचा प्रसंग त्यांनी या कवितेतून दर्शवला आहे. ही नवी नवरी आपल्या माहेरच्या सोयऱ्यांची वाट बघते आहे. तिला सगळं काही सोडून माहेरी जायचे आहे मात्र तिचे सासर हेच तिचे आता घर आहे हे ही एक सत्य आहे. ते कसेही असले तरीही हा पसारा आता तिलाच आवरायचा आहे. म्हणूनच कवयित्री म्हणतात, 'पुढे चालली वाट एकली / मागे आहे घर सासरचे / आहे तिथला उभा पसारा.' या नव्या नवरीच्या मनात उठलेलं वादळ त्यांनी योग्य शब्दांत मांडलेले आहे. आईला घट्ट मिठी मारून तिला आपले मन हलके करायचे आहे मात्र ती तसेही करू शकत नाही. लहापणी तिने रंगवलेली असंख्य स्वप्ने कोसळताना तिने पाहिलेली आहेत.

थोडक्यात, वेगवेगळ्या विषयांवर कविता तयार करून भावनांची उधळण हे या कविता संग्रहाचे वैशिष्ट्य आहे असे मला वाटते. यातील सगळ्याच कवितांमधून खूप मोठा अर्थ कवयित्रींनी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संदर्भ :** शेळके. शांता (१९९९): गोंदण, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस.

## प्रेमाचा खरा अर्थ सांगणारी कविता – विश्व प्रेमिकांचे

-सरोजा गांवकर (द्वितीय वर्ष कला)

शांता शेळके यांची कविता वाचताना मन हरवून जाते. त्यांच्या काव्यातील शब्दकळा, प्रतिमांचा केलेला वापर, लय-ताल इत्यादी गोष्टी त्यांच्या कवितेचे सौंदर्य वाढवतात.

जगात प्रेम ही अशी एकमेव गोष्ट आहे जी दुसऱ्याला दिल्याने वाढते. प्रेम म्हणजे नेमके काय हे सांगणारी कवयित्री शांता शेळके यांची एक प्रसिद्ध कविता म्हणजे ‘हे विश्व प्रेमिकांचे’. ही कविता आपल्या पिढीने खरंच वाचण्यासारखी आहे.

**विश्व प्रेमिकांचे !**

असता समीप दोघे, हे ओठ मूक व्हावे.
शब्दांविना परंतु, बोलून सर्व जावे.

अतृप्त मीलनाचे, विरहातही सुखाचे.
विश्वाहुनी निराळे, हे विश्व प्रेमिकांचे !

फसवा वरून राग, रुसव्यात गाढ प्रीती.
होता क्षणिक दूर, वेडी मनात भीती

दिनरात चिंतनाचे, अनिवार कौतुकाचे.
विश्वाहुनी निराळे, हे विश्व प्रेमिकांचे !

दूरातही नसावा, दोघांमध्ये दुरावा.
स्पर्शाविना सुखाने, हा जीव मोहरावा.

ओठी फुलून यावे, स्मित गोड सार्थकाचे.
विश्वाहुनी निराळे, हे विश्व प्रेमिकांचे !

-शांता शेळके

पहिल्या कडव्यात कवयित्री म्हणतात की, जेव्हा आपण सोबत असू, तेव्हा आपले ओठ मूके व्हावे आणि काही शब्द न बोलता आपण एकमेकांना समजून घ्यावे. काहीच न बोलता एखाद्या माणसाच्या मनात काय चाललेलं आहे हे समजून घेणं म्हणजेच खरे प्रेम असे कवयित्री सांगतात.

दुसऱ्या कडव्यात कवयित्री म्हणतात की, आपले मिलन जरी कधी झाले नाही तरीही आपण या विरहात सुखी राहावे. या संपूर्ण विश्वाहून आपले प्रेम निराळे व्हावे. दुर असूनही आपण सोबत आहोत असे जेव्हा वाटते, एखाद्या व्यक्तीचा आधार वाटतो, तिच्याविषयी प्रेम, माया वाटते असेच प्रेम विश्वाहूनी निराळे असते.

तिसऱ्या कडव्यात कवियत्री म्हणतात की कधी राग आला तरी त्या रागात प्रेम असायला हवे. आणि माझ्या वेड्या मनाला भिती वाटते की तू कधी दूर न व्हावे. रागाच्या भरात नाते तुटता कामा नये. आजकाल आपण हेच करतो. भांडण झालं, राग आला की नातंच तोडून टाकतो. ते प्रेम नव्हे.

एखाद्या व्यक्तीला आपल्याविषयी कौतुक वाटते, आपल्या यशात ती स्वतः आनंद साजरा करते यातच प्रेम असते. हाच आशय कवयित्रीने चौथ्या कडव्यात सांगितलेला आहे.

पाचव्या कडव्यात कवयित्री म्हणतात की, आपण दूर जरी असलो तरीही आपल्या दोघांमध्ये कधीही दूरावा नसावा. मनाचा दुरावा हा जास्त त्रास देणारा असतो. ह्या विरहातही एकमेकांच्या स्पर्शाविना सुखाने हा जीव मोहरावा.

सहाव्या कडव्यात कवयित्री म्हणतात की, प्रेमाने जीवन गोड आणि अर्थपूर्ण असावे चेहऱ्यावर नेहमी हास्य ठेवावे आणि जीवन आनंदी बनवावे. या जगामध्ये प्रेम ही एक निखळ आनंद देणारी गोष्ट आहे.



# निबंध

# निसर्ग

**-रेखा मायनाथ (प्रथम वर्ष कला)**

निसर्ग ही देवाने निर्माण केलेली सर्वात अद्भुत व सुंदर कलाकृती आहे, जी त्याने एक मौल्यवान भेट म्हणून मानवाला दिली आहे. निसर्ग खूप सुंदर आहे. तो प्रत्येकाच्या जीवनाचा एक महत्वाचा भाग आहे.

निसर्ग अनेक रंगांनी परिपूर्ण आहे. तो माणसाच्या मूलभूत गरजा पुरवतो. आपल्याला श्वास घेणासाठी प्राणवायू, राहायला घर, घालायला कपडे, जीवंत राहायला अन्न ह्या सगळ्या गोष्टी निसर्गातूनच तर येतात. यात माणसाचे श्रेष्ठत्व कुठेच नाही. मात्र तरीही माणूस निसर्गापेक्षा स्वतःला मोठा समजतो.



निसर्ग हा खरेतर आपल्या आईसारखा आहे. तो आपल्याला सांभाळतो, आपल्यावर संस्कार करतो. तो गुरुचीही भूमिका करतो. निसर्गातून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. तो आपल्याला निस्वार्थी भावनेने द्यायला शिकवतो.

निसर्गातील वेगवेगळ्या ऋतूंनुसार माणसांच्या गरजा भागत असतात. आज मात्र माणसांच्याच करणीमुळे संपूर्ण ऋतूचक्रच बिघडलेले आहे. ज्याचे परिणाम माणसांनाच भोगावे लागतात. कधीही उन्हाळा, जीव कासावीस करणारा उकाडा, बाराही महीने पाऊस आणि शास्त्रासाठी हिवाळा असे काहीसे सध्याचे ऋतूचक्र झालेले आहे. याला कारणीभूत फक्त माणूस आहे. प्रगतीच्यामागे धावणारा माणूस निसर्ग नष्ट करत चाललेला आहे हे त्याच्या कसे ध्यानी येत नाही?

अजूनही वेळ गेलेली नाही. निसर्ग वाचला नाही तर माणूस वाचणार नाही हेच सत्य आहे. म्हणूनच म्हणते, ‘निसर्ग वाचवा, जीवन जगवा’.

## मला पंख असते तर ?

-करिश्मा जाधव (द्वितीय वर्ष कला)

संध्याकाळची वेळ होती. पाण्याचा खळखळ आवाज येत होता. वातावरण शांत व थंड होते. सूर्य नारंगी रंगाचा दिसत होता. सूर्य पश्चिमीला मावळत होता. सूर्य पाण्यातच बुडत आहे असे वाटत होते. मी तेव्हा तिथे सागर किनाऱ्याजवळ बसले होते. सगळीकडे खूप शांतता पसरली होती. पक्ष्यांचा मधुर किलबिलाट ऐकताच माझी नजर पक्षांकडे गेली. ते मुक्तपणे आकाशात उडत होते. ना कोणाचीच भीती, ना कसली चिंता ! ते आनंदाने आपले पंख फडफडून खुशाल आकाशात उडत होते.

हे पाहून माझ्याही मनात एक विचार आला, मलाही पंख असते तर? तर मी उंच आकाशात उडण्याचा अनुभव घेतला असता. मला पंख असते तर मी झाडावर बसले असते एका झाडावरून दुसऱ्या झाडावर गेले असते. मला पंख असते तर मी उडून माझ्या मामाच्या गावी गेले असते. जर मला पंख असते तर मी संपूर्ण जगाचा प्रवास केला असता. त्यासाठी मला बस किंवा इतर वाहनांची गरज नसती लागली. हवा प्रदूषणही झाले नसते आणि माझे पैसेही वाचले असते.



जर मला पंख असते तर मी महाविद्यालयातउडत उडत गेले असते. म्हणजे मला कधीच उशीर झाला नसता. जर मला पंख असते तर इतर पक्षी माझे मित्र – मैत्रीणी झाल्या असत्या. मला पंख असते तर मी मस्त उंच आकाशात उडले असते.

जर मला पंख असते तर मी लोकांना मदत केली असती. उंच आकाशात जाऊन लोकांचे खरे जगणे पाहिले असते. जे लोक दुसऱ्यांवर अन्याय करतात त्यांना मी पोलिसांच्या हवाली केले असते. जर मला पंख असते तर मी पोलिसांना मदत केली असती. उडून जाऊन चोरांना पटकन पकडले असते. जर मला पंख असते तर मी लहान मुलांना माझ्या पाठीवर बसवून आकाशात फिरवले असते त्यामुळे

त्यांनाही हा मुक्त अनुभव आला असता. जर मला पंख असते तर मी विश्वाची भ्रमंती केली असती. जर मला पंख असते तर!


पण असे होऊ शकत नाही. मला पंख येऊ शकत नाही. पण आपण एक गोष्ट नक्की करू शकतो. कोणती म्हणून काय विचारताय? आपल्या हक्काचे स्वातंत्र्य आपण टिकवू शकतो. पक्षांसारखे आपणही मुक्त आहोत. आपण जो पर्यंत स्वप्ने पाहू तोपर्यंत आपणही पक्षांसारखेच उडू शकतो. आपल्या स्वप्नांना पंख देऊन त्या पंखांना कष्टाचे बळ देऊया. तेव्हा यशाचे आभाळ आपलेच आहे.



## माझे स्वप्न

-प्रीती जामुनी (द्वितीय वर्ष कला)

स्वप्ने पाहणे ही माणसांची प्रवृत्ती आहे. आपण अनेक स्वप्ने पाहत असतो. बऱ्याच वेळा ती स्वप्ने पूर्ण होतात तर काही वेळा अपूर्ण राहतात. लहानपणापासूनच मी ही एक स्वप्न पाहिलेले आहे. मला शिक्षिका व्हायचे आहे. लहानपणीच्या खेळातून कधी ही इच्छा मनात घट्ट झाली काही कळलेच नाही.




लहान मुलांना शिकवायला मला खूप आवडते. लहान वयात मुलांना आपण जसे बनवू तसे ते घडतात. त्यांच्यावर चांगले संस्कार करून त्यांच्या आयुष्यात त्यांना सफल बनताना मला पहायचे आहे. खास करून खेडे गावातील मुलांना शिकायची आवड असते. पण त्यांना अनेक त्रास सहन करावे लागतात. खेडेगावात शहरातील शिक्षक जायला बघत नाही. मात्र मला अशा मुलांसाठी शिक्षक बनायचे आहे.

गरजू व गरीब विद्यार्थ्यांना मोफत किंवा कमी पैशात शिक्षण मिळेल यासाठी मी प्रयत्न करेल. ज्या मुलांना शाळेत जायला मिळत नाही त्या मुलांपर्यंत शाळा आणणे हे माझे स्वप्न आहे.

माझ्यासाठी माझे शिक्षक माझे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी जसे आम्हाला समजून घेतले तसेच मला करायचे आहे. शिक्षण घेताना शिस्त महत्वाची. त्यामुळे एक शिक्षिका म्हणून त्यांना शिस्त लावणे हे माझे कर्तव्य आहे.

फक्त परीक्षेत चांगले गुण मिळवून आज चालत नाही. त्यामुळे मी त्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच आजूबाजूच्या गोष्टीही सांगेन. ज्यामुळे त्यांचा सगळ्या बाजूंनी विकास होईल.



# कविता

# मुलगी झाली म्हणून काय झालं?

-धन्यता देसाई (द्वितीय वर्ष कला)

मुलगी झाली म्हणून काय झालं?
जीव आहे मला पण
लिंग मी नाही निवडलं
निसर्गानेच ते दिव्य मला दिलं.

मुलगी झाली म्हणून काय झालं?
तिने का म्हणून एका चौकटीत राहायचं ?
त्याच्या प्रगतीसाठी तिने का थांबायचं ?
सगळ्याच क्षेत्रात आता ती ही वावरते.
रोजच्या घरकामात त्याने का नाही वावरायचं ?

लग्नाच्या बेडीत अडकवलं तिला
संसाराच्या बेडीत गुरफटवलं
संसार थाटला, नाती जपली,
सगळं दुसऱ्यांसाठी केलं
तिने मात्र आपलं सुख गमावलं.

मुलगी झाली म्हणून काय झालं?
समान हक्क तिलाही आहे
मुलगा मुलगी भेदभाव काय करताय?
शेवटी दोघे एकच आहेत.

(ह्या कवितेला राज्यस्तरीय पातळीवर दुसरे पारितोषिक लाभलेले आहे.)



## एक तरी मुलगी असायलाच हवी

**-श्रद्धा महाले (तृतीय वर्ष कला)**

जन्म घेते ती
जन्म घेते ती
आईच्या पोटी
खंबीर राहते ती वडिलांच्या पाठी
प्रत्येक क्षण आनंदाने जगणारी
एक तरी मुलगी असायलाच हवी.



जिच्या नाजूक पावलांनी
घर जाते अगदी खुलून
जिच्या मधूर स्वरांनी
जग जाते हरवून
अशी प्रत्येकाला आपलेसे करणारी
एक तरी मुलगी असायलाच हवी.

मनी वसे जरी अनंत दुःख
त्यात ही शोधते ती नेहमी सुख
स्वप्नपूर्तीच्या आशेने गगन भरारी घेणारी
एक तरी मुलगी असायलाच हवी.

मैत्रिणीच्या रूपात नांदणारी ती
नकळत होते आईवडिलांची सावली
रौद्र रूपात जग सावरणारी ती
नकळत होते जगाचीच माऊली
परक्या घराला कवेत घेते
सर्वांना आपलेसे करते
राग लोभ पोटी ठेऊन
सर्वांची पापे पदरी घेते

होय! अशी ती ..
उदार मनाची

अस्तित्व तिचे असेच
दुसऱ्यांसाठी वेचू नका
स्वतःसाठी तिला
एकदा जगायला शिकवा

तिला लढायला शिकवा स्वतःसाठी
पेटून उठेल ती उद्या सत्यासाठी
तोडून साखळदांडी
हे जग सावरेल ती
अशी स्त्रीत्वाला जन्म देणारी

एक तरी मुलगी असायलाच हवी ..

एक तरी मुलगी असायलाच हवी..



# आमची मुलगी

-पूजा खोलकर (तृतीय वर्ष कला)

आमची मुलगी जणू पहाटेचा शुक्रतारा
वाणीत तिच्या अमृताचा गोडवा

आमची मुलगी जन्मास येवूनी
दानदीप उजळले आमुच्या मनी



आमची मुलगी गोड आरती
खण-खण गाती
निनादे आसमंतात

आमची मुलगी, आभाळ
स्वच्छ, निरभ्र, अनंत

आमची मुलगी शारद चंद्रमा
उजळे तिच्या हातांतूनी
कोजागिरी पौर्णिमा

आमची मुलगी मुरलीची धून
जरी लोण्याहूनी मऊ
तरीही वज्राहूनी कठोर

आमची मुलगी
तिची न्यारीच किर्ती
जन्म घेऊनी तिने केली
अवघ्या आशांची पूर्ती.

# गुरु आणि शिष्य

-सिद्धू लांबोर (तृतीय वर्ष कला)

तेच उत्तम वृक्ष
ज्याच्या फांद्या
पसरतात
जगभर.
ज्या फांद्यांना
ओळखते जग
त्याचे मूळ घर
म्हणजे ते वृक्ष.
वृक्षामध्ये मूळ
जी शोधते
तीच उत्तम फांदी.



# मन

-अनामिका सावंत (प्रथम वर्ष कला)

का नेहमी कावरे – बावरे
असते हे मन ?
कसे समजावू ह्या मनाला ?
कसली ही हुरहूर
नेहमी असते त्याला ?
आज हसले
की उद्या रुसून बसते.
आज शहाणे बनले
तर उद्या परत हट्ट करते.
सगळ्या जुन्या आठवणी
साठवून ठेवते हे मन.
नाती जोडायला
शिकवते हे मन.
किती हळवे, किती चंचल
आहे हे मन.
दाही दिशा भटकत असते
म्हणूनच का नेहमी
कावरे – बावरे
असते हे मन ?



# रात्र

- नवनाथ वेळीप (तृतीय वर्ष कला)

त्यात टीमटीमणारे लाखों तारे आभाळी
अनेकांच्या इच्छा पूर्ण करण्याच्या मार्गी असलेले
खाली मी निवांत बसलेला.



खरंच का हे तारे आपल्या इच्छा पूर्ण करतात?
मग रस्त्यावर झोपणाऱ्या त्या थकलेल्या हातांना
का नसेल विश्रांती?
का नाही झोंबत असेल त्यांना ऊन आणि पाऊस?
की हे तारेच देत असतील काय त्यांच्या हातांना बळ?
का नसेल कुणीच समाधानी ह्या जीवनात?
कुठे बरं पळत असतील
ही सगळी लोकं दररोज सकाळी?
खरंच का पोटाचा प्रश्न इतका मोठा असतो?
पोटासाठीच चाललेली आहे का
ही शर्यत भली मोठी ?
असेल ही..
किड्यांची किरकीर ह्या काळ्या कुट्ट रात्री
एवढे काय बोलायचं असेल बरं ह्यांना
रोज नव्या अंधाऱ्या रात्री?
की ते ही करत आहेत,
श्रमिकांच्या श्रमाची वजाबाकी ?
दुसऱ्या दिवशी परत शर्यत सुरू करण्याची तयारी...
असो..
त्या पेक्षा ही रात्रच बरी...


थोडं
व्याकरण
शिकुया.

# विभक्ती

**-वैभवी फातर्पेकर (तृतीय वर्ष कला)**

प्रत्येक वाक्य एका शाळेसारखे असते. त्या शाळेत मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी व इतर कर्मचारीही असतात. शाळेत प्रमुख व्यक्ती म्हणजे मुख्याध्यापक त्यांचे मुलांशी नाते वेगळे असते. हीच गोष्ट आपल्याला वाक्यातही पाहायला मिळते.

वाक्यातील शब्दांचा क्रियापदांची किंवा इतर शब्दांची काही ना काही संबंध असतो. या संबंधाला व्याकरणात `कारक' असे म्हणतात. वाक्यातील शब्द जसे मूळ स्वरूपात असतात तसेच त्यांचा वाक्यात वापर केला जात नाही. वाक्यात वापरताना आपल्याला त्यांच्या स्वरूपात बदल करावा लागतो.

उदाहरणार्थ: 'पोलीस मधू रस्ता काठी मार' अशा शब्दाच्या मांडणीने काहीच बोध होत नाही. या शब्द समूहाला आपण वाक्य म्हणू शकत नाही. ह्या शब्दांचा वाक्यात प्रयोग करण्यासाठी आपल्याला 'पोलीसाने मधुला रस्त्यात काठीने मारले' अशा पद्धतीने ते वाक्य तयार करावे लागणार.

**वाक्यातील शब्दांचा संबंध दाखवण्यासाठी नाम किंवा सर्वनाम यांच्यामध्ये जो बदल होतो त्याला व्याकरणात 'विभक्ती' असे म्हणतात.** नामाचा किंवा सर्वनामाचा वाक्यात वापर करत असताना त्याला जी अक्षरे जोडतात त्याला 'प्रत्यय' असे म्हणतात. वरील वाक्यात `ने, ला, त' ही अक्षरे जी नाम, सर्वनाम, विशेषण यांना जोडलेली आहेत त्यांना विभक्तीचे प्रत्यय म्हणतात.

विभक्तीचे प्रत्यय लावण्यापूर्वी नामाच्या किंवा सर्वनामांच्या स्वरूपात जो बदल होतो त्याला सामान्यरूप असे म्हणतात. जसे कि, 'पोलिस' ह्या नामाचे 'पोलिसा' असे सामान्यरूप करून त्याला विभक्तीचा प्रत्यय जोडला जातो.

प्रत्येक वाक्य म्हणजे एक विधान असते. त्यात कर्ता, क्रम व क्रियापद अशी रचना असते. क्रिया करणाऱ्या व्यक्तीला `कर्ता' म्हणतात. कर्ता जी क्रिया करतो त्याला कर्म असे म्हणतात. कोणावर? कशासाठी ?कशाने केली? किंवा केव्हा घडली? हे सांगणारे शब्द आपल्याला वाक्यात सापडतात. नामांचा क्रियापदांशी किंवा इतर शब्दांशी असणारा संबंध आठ प्रकारचा असतो. म्हणून

विभक्तीचे एकूण आठ प्रकार मानले जातात. प्रकार म्हणजे १) प्रथमा २) द्वितीया ३) तृतीया ४) चतुर्थी ५) पंचमी ६) षष्ठी ७) सप्तमी ८) संबोधन. यातील पहिल्या सात प्रकारांना संस्कृतातील नावे दिली आहेत व आठव्या प्रकारात येणाऱ्या वाक्यांचा एखाद्याला संबोधन करताना म्हणजेच हाक मारताना वापर केला जातो म्हणून त्याला संबोधन असे म्हटले जाते. पुढील तक्त्याच्या आधारे एकवचनी व अनेकवचनी शब्दांमध्ये विभक्तीचे प्रत्यय कसे

विभक्तीचे प्रत्यय व मूल या नामाची होणारी रुपे

| विभक्ती | एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|---|
| | प्रत्यय | शब्दांची रुपे | प्रत्यय | शब्दांची रुपे |
| प्रथमा | -- | मूल | -- | मुले |
| द्वितीया | स, ला, ते | मुलास, मुलाला | स, ला, ना, ते | मुलांस, मुलांना |
| तृतीया | ने, ए, शी | मुलाने, मूलाशी | नी, शी, ई, ही | मुलांनी, मुलांशी |
| चतुर्थी | स, ला, ते, | मुलास, मुलाला | स, ला, ना, ते | मुलांस, मुलांना |
| पंचमी | ऊन, हून | मुलाहून | ऊन, हून | मुलांहून |
| षष्ठी | चा, ची, चे | मुलाचा, मुलाची | चा, ची, चे | मुलांचा , मुलांची |
| सप्तमी | त, ई, आ | मुलात | त, ई, आ | मुलांत |
| संबोधन | -- | मुला | नो | मुलांनो |

**विभक्तीच्या प्रत्ययांचा वाक्यात प्रयोग**

**प्रथमा**

एकवचनी : ते **मूल** आईला शोधत होते.

अनेकवचनी : ती **मुले** रडत होती.

**द्वितीया**

एकवचनी : त्या **मुलाला** ताप आला होता.

अनेकवचनी : सगळयाच **मुलांना** हल्ली ताप येतोय.

**तृतीय**

एकवचनी : त्या **मुलाने** नव्या शाळेत प्रवेश मिळवला.

अनेकवचनी : त्या **मुलांनी** नव्या शाळेत प्रवेश मिळवला.

**चतुर्थी - अप्रत्यक्ष क्रमाची विभक्ती चतुर्थी असते.**

एकवचनी : गुरुजी **विद्यार्थ्यास** व्याकरण शिकवतात.

अनेकवचनी : गुरुजी **विद्यार्थ्यांना** व्याकरण शिकवतात.

**पंचमी**

एकवचनी : ते गणीत त्या **मुलाहून** सोडवता येणार नाही.

अनेकवचनी : ते गणीत **मुलांहून** सोडवता येणार नाही.

**षष्ठी**

एकवचनी : त्या **मुलाची** आज परीक्षा आहे.

अनेकवचनी : **मुलांची** आज परीक्षा आहे.

**सप्तमी**

एकवचनी : माझा जीव त्या छोट्या **मुलीत** फार रमला.

अनेकवचनी : माझा जीव छोट्या मुला-**मुलींत** फार रमतो.

**संबोधन**

एकवचनी : **मुला**, मोठ्यांचा आदर करावा.

अनेकवचनी : **मुलांनो** चांगला अभ्यास करा.